१० मे २०२१

मासिकांक ३

# “ती”..चं पान

## तिच्या कडून सगळ्यांसाठी...

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखिका | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | सौ. सायली देशपांडे | ३ |
| २ | दोन शब्द | श्री. सुनिल शिनखेडे | ४ |
| ३ | स्पर्श- प्रवास जाणिवेचा | सौ. तृष्णा आंबेकर | ५ |
| ४ | एकाच या जन्मी जणू | कु. स्वर्णिमा कमलवार | ९ |
| ५ | मला खूप काही शिकायचंय | कु. निर्मिती देवलसी | १२ |
| ६ | प्रवास 'स्व' त्वाचा | सौ. अपूर्वा भालेराव | १४ |
| ७ | निरंतर प्रवास | सौ. मृण्मयी सारंग | १६ |
| ८ | स्वयंप्रकाशी तू तारा | सौ. सायली देशपांडे | १८ |
| ९ | कळीचे फुल होताना | कु. प्राजक्ता बर्वे | २० |
| १० | प्रवास जीवनाचा | कु. भार्गवी बाबरेकर | २२ |
| ११ | समारोप | सौ. सायली देशपांडे | २५ |

# प्रस्तावना

रसिकहो, "ती" चं पान या मासिकांकाच्या तिसऱ्या आवृत्तीचं प्रकाशन करतांना अत्यंत आनंद होतो आहे. कुठल्याही नवीन उपक्रमाची सुरुवात झाली की तो उपक्रम आणि त्यात असलेला विचार चिरकाळ टिकावा असं कायम वाटतं. संपादक म्हणून या अंकाकडे बघत असतांना यात लिहिणाऱ्या प्रत्येक लेखिकेचं कौतुक तर वाटतंच पण त्याचबरोबर त्यांना स्वतःची लेखिका अशी  ओळख व्हायला आहे हे बघून समाधान वाटतं.

यात त्यांचं होत असलेलं लिखाण हे आपल्या सारख्या रसिक वाचकांपर्यंत पोहोचतंय यातच आम्हाला सगळं काही मिळालं असं म्हणायला हरकत नाही. म्हणजेच काय? तर या निमित्ताने कां होईना 'ती' ला स्वतःचं असं हक्काचं पान मिळतंय हे ही नसे थोडके...!

या सगळ्या शब्दांच्या प्रवासात मन कसं आनंदून जातंय.  हा अंक " प्रवास" या शब्दाभोवती गुंफल्या गेला आहे. प्रत्येकीच्या प्रवासाला एक वेगळा विचार आहे वेगळा आयाम आहे. कुठे कथा आहे तर कुठे
"स्व"त्व सापडणारा प्रवास आहे. असा हा प्रत्येकीचा आगळावेगळा प्रवास खास तुमच्यासारख्या वाचनप्रेमी आणि चोखंदळ रसिकांसाठी...!

यात कदाचित तुम्हाला पण तुमचा असा स्वतःचा प्रवास गवसेल. अशी आशा आहे. तेव्हा तिच्या प्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी व्हा आणि प्रवासाचा आनंद घ्या...!

- सौ सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द

नव्या जाणिवांची अभिव्यक्ती

उमेद ही जगातील सर्वात सुंदर गोष्ट आहे. व्यष्टी ते समष्टी, जग जोडणारी, सृजनशील, हिरवीकंच. "ती" चं पान च्या निमित्ताने उमललेल्या या पोपटी पालवीमुळे अनेक उमलत्या कळ्यांना आश्वस्त होता येणार आहे. भवतालच्या सध्याच्या अस्वस्थ वातावरणात हा दिलासा म्हणजे दाहक तल्खलीनंतर मृदगंधाने मोहरून जाण्यासारखंच आहे. अभिव्यक्तीची उर्मी म्हणजे स्वत:ची नवी ओळख. या ओळखीचं प्रतिबिंब "ती" चं पान च्या पहिल्या दोन अंकात बघायला मिळालं. हा अनुभव सर्वांचाच हुरूप वाढवणारा आहे. संपादिका सौ सायली पेशवे देशपांडे आणि सर्व लिहित्या हातांचं त्याबद्दल अभिनंदन..

सायलीची धडपड मी गेले वर्षभर जवळून बघत आलोय. सगळीकडे जणू कोंडल्यासारखं वातावरण असतांना तिने कधी "थाटाचा घाट" घालून सुरांची वाट मोकळी करून दिली तर कधी संस्कृत महाकाव्यातल्या नायिकांना बोलतं केलं . सायली हे एक सूत्र आहे. समान जाणिवांच्या हरहुन्नरी कलावंतांना जोडणारं, एका धाग्यात गुंफणारं आणि आनंद देणारं. आता या अंकाच्या निमित्ताने तिच्या आणि तिच्या मैत्रिणींच्या कल्पक , अनुभवी शब्दबहराचा सुगंध दरवळणार आहे.

या अंकाची संकल्पना आहे "प्रवास" हा रमणीय विषय तुम्हाला आनंद देईल. या अंकाच्या निमित्ताने सुरु झालेल्या नव्या जाणिवांच्या या लेखनप्रवासाला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा...!

-सुनिल शिनखेडे

सोलापूर आकाशवाणी केंद्र प्रमुख

# "स्पर्श" - प्रवास जाणिवेचा

आज सकाळी सगळी कामं आवरून रमा ऑफिसला जायला  निघाली , जाताना दोन मिनिटे खोलीत गेली रुक्मिणीला म्हणाली "आई मी निघतेय,आज लवकर येते संध्याकाळी आई(तिच्या सासूबाई) आणि राघव गावाला जायचेत ,त्यांचा डबा करायचाय त्यामुळे लवकरच यावं लागणारे,तू आणि आई जेवून घ्या, मुलं आहेत घरी,आई समोर बसलेल्या आहेत तुझं आवरलं की बसा तुम्ही दोघी गप्पा करत,मी येतेच,चल बाय" रमा ऑफिसला गेली.

ती येईपर्यंत रुक्मिणी आणि रमाच्या सासुबाईनी डब्याची सगळी तयारी करून ठेवली.. आल्यावर रमाने डबा केला, सगळं नीट भरुन ठेवलं,राघव ऑफिसमधून आल्यावर लगेच तो आणि सासुबाई निघणार होते असं राघवनं आधीच फोन करून सांगितलं होतं,राघव आल्यावर त्यानी बाहेरूनच हॉर्न दिला, तशी धावतच रमा बाल्कनीत आली, राघव म्हणाला "आईला घेऊन ये आम्ही लगेच निघतो", सासुबाईना आवरून तिनं खाली यायला सांगितलं,तोवर ती पुढं गेली राघवला भेटायला , तोही गाडीतून खाली उतरला ,पुढे आठ दिवस दोघांची भेट होणार नव्हती, तेव्हा घराच्या कंपाऊंड वॉलवरून जरासं बाहेर येत सावली देणाऱ्या चाफ्याच्या झाडाखाली ते दोघं आई येईपर्यंत बोलत उभे होते.,रमा म्हणाली "लवकर ये हं, तू नसलास की मला करमत नाही घरात","येस डार्लिंग लवकर येतो, मला पण नाही करमणार तू  सोबत नाहीयेस तर,पण आता घरी कोणीच नाहीये आणि आई बऱ्याच दिवसांनी आल्यात तर त्याच्याशी छान गप्पा कर, त्यांना पूर्ण वेळ दे,मी येतोच लवकर" असं म्हणून त्यानी तिला जवळ घेतलं,ती ही क्षणभर त्याच्या मिठीत विसावली..पण आईच्या येण्याची चाहूल लागताच दोघंही बाजूला झाले..आई गाडीत बसली तशी राघवने गाडी सुरू केली,"येतो गं काळजी घ्या"सासुबाई म्हणाल्या.."चल रमा निघू आम्ही? पोहोचलो की फोन करतो" म्हणत राघवने गाडी पुढे नेली, गल्लीच्या कोपऱ्यावरून वळताना पुन्हा गाडी स्लो करून राघवने रमाला हाताने बाय करत गाडीचा वेग वाढवला.. हे सगळं रुक्मिणी बाल्कनीत उभं राहून पाहात होती, तिलाही ऋत्विजच्या आठवणीने भरून आलं होतं..

त्या दोघांना सोडून रमा घरात आली,ती येण्याआधीच रुक्मिणी सोफ्यावर येऊन बसली होती,आत आल्यावर रमाही तिच्या शेजारी जाऊन बसली,"आई गं आज कितीतरी दिवसांनी मी अशी निवांत बसलेय गं, तेही तुझ्या शेजारी",रमा म्हणाली.. "खरं सांगू तुझे बाबा गेल्यापासून मला बऱ्याचदा असा वेळ मिळतो गं ,पण तो मला नको वाटतो,तो माझ्यासाठी अन् मी त्याच्यासाठी एवढंच आमचं जग आहे हे जाणवू लागलं होतं आताशा आम्हाला" रुक्मिणी बोलत होती. आता ही आणखी या विषयावर बोलत राहिली तर तिचा पूर्ण मूड बदलून जाईल हे रमाच्या लक्षात आलं होतं तेव्हा लागलीच विषय बदलवत रमा म्हणाली,"ए आई, किती दिवस झाले तुझ्या हातचे गरम गरम थालीपीठ खाल्लेले नाहीत,कर ना गं आज", कशीतरी विचारांना बाजूला सारून रुक्मिणी तयार झाली.

आता विषयांतर करून रुक्मिणीला त्या विचारातून पूर्णपणे बाहेर काढणं गरजेचं होतं, म्हणूनच थालीपीठासाठी लागणारं साहित्य काढता काढता रमा बोलत होती,"आई तुला आठवतं का गं आजी किती छान करायची ना थालीपीठं, "आईच्या हातची थालीपीठं तर माझ्या ऋत्विजलाही खूप आवडायची"रुक्मिणी मनातच पुटपुटली, ऐकूनही न ऐकल्यासारखे दाखवत रमा पुन्हा बोलु लागली "तुला माहितीये आई आम्ही तिचा एकदा चोरुन फोटो काढलेला, थंडीच्या दिवसात चुलीवर सगळ्यांसाठी थालीपीठं करत होती तेव्हाचा, तिला तो फोटो दाखवला तेव्हा इतकी हसली गं ती स्वत:चाच फोटो पाहून".रुक्मिणीने विचारलं "रमा तुझ्याजवळ आहेत का गं तुझे लहानपणीचे फोटोज", "हो माझेही आहेत आणि तुझेही लहान असतानाचे फोटो ठेवलेत मी, सुश्रुत मामाकडून घेतले होते मी ते" रमा सांगत होती."खरंच का गं, बघुयात आज आपण..?" रूक्मिणीनं विचारलं."हो चालेल, मी पण त्यातले सगळे फोटो नीट बघितलेच नव्हते तुझ्यासोबत माझंही बघणं होईल,तसंही उद्या रविवारच आहे आणि नंतरही मी रजेवर आहे २-३ दिवस" रमा म्हणाली.जेवणं आटोपून दोघीही फोटो बघायला बसल्या, फोटो बघता बघता रुक्मिणी पुन्हा एकदा भूतकाळात जाऊन आली, सगळ्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या होत्या, मग ती रमाला एक एक प्रसंग सांगत होती.एका फोटोत रुक्मिणी तिच्या काकूच्या मांडीत होती आणि काकू तिला चमच्याने काहीतरी भरवत होती"तुला माहितीये, मी माझ्या आईपेक्षा काकूच्या जास्त जवळ होती,कारण मला समज आल्यानंतर एकदा माझी आई खूप दिवसांपासून आजारी होती तेव्हा माझी काकू म्हणजे मुग्धा आजीच मला सांभाळत असे, मला आठवतं, एकदा मला खूप ताप असताना रात्रभर थंड पाण्याच्या पट्ट्या बदलून सारखा ताप मोजत मला मांडीवरच घेऊन होती, त्यानंतर मोठी झाल्यावरही आई जवळ नसली की मी काकूच्या मांडीत डोकं ठेऊन झोपत असे,मला अजूनही काकूच्या मांडीतली ऊब आणि डोक्यावरून फिरणाऱ्या तिच्या हातांचा तो स्पर्श अजूनही आठवतो".

रुक्मिणी सांगू लागली.. "अगं लहान असताना मी आणि सुश्रुत मामा खूप खेळायचो, मी नेहमी हट्ट करायचे की तू मला घेऊन बस पाळण्यावर, तोही माझे सगळे हट्ट पुरवायचा,पण पाळण्यावर त्याने झोके घ्यायला सुरुवात केली की मी दोन्ही हाताने त्याचं टी-शर्ट घट्ट धरून ठेवायची,तसा तो लगेच दोन्ही हाताने छातीशी घट्ट धरून मला आधार देण्याचा प्रयत्न करायचा,त्याचे ते पाठीवर असलेले दोन हात मला नेहमीच आधार आणि विश्वास देतात तो सोबत असल्याचा, अगदी अजूनही.,,रमा खरं सांगू हा स्पर्शातून जाणवणारा विश्वास नेहमी मनोबल वाढवणारा असतो"रुक्मिणी बोलत होती तेव्हा रमाच्या डोळ्यासमोर संपूर्ण चित्र उभं राहात होतं, ती म्हणाली,आई तुमच्या वेळचे दिवस किती वेगळे होते गं," रुक्मिणी म्हणाली "हो गं अगदी खरंय", पुढे ती सांगत होती "त्यानंतरही एकदा सुश्रुत मामाने मला एका संकटातून वाचवलं होतं"रमानी विचारलं "ते केव्हा गं आई,, "अगं लहान असताना मी सुश्रुत मामा आणि सावनी..,"म्हणजे ती तुझी बेस्ट फ्रेंड ना" मधेच रमा म्हणाली,.."हो, तीच, आम्ही तिघंही सोबत ऑटोनी शाळेत जायचो, येताना शाळा सुटली की मी शाळेच्या ग्राऊंडवर असलेल्या एका झाडाखाली बसून सुश्रुत दादाची वाट बघायचे आणि तो आला की मग आम्ही तिघंही सोबतच ऑटोत बसायचो, मग आम्ही बसताच ऑटो भर्रर्र दिशी घराकडे निघायचा,पण त्यादिवशी काही वेगळंच घडलं, सुश्रुत दादा आला तेव्हा मी तिथं नव्हते आणि सावनी देखील मला शोधत गेटजवळ जाऊन पोहोचली होती.

सुश्रुत दादा आधी न घाबरता ऑटोजवळ आला, तिथं आल्यावर मी त्याला रडताना दिसले, मी ऑटोत बसली होती आणि ऑटोवालाही तिथेच होता, दादाला पाहाताच ऑटोवाला पळून गेला, दादानी मला शांत करण्याचा प्रयत्न केला पण माझं रडणं थांबेचना, मी खूप घाबरले होते, तेव्हा तो मला धावतच शाळेतील शिक्षकांजवळ घेऊन गेला, तिथे गेल्यावर मी रडतच सगळा घडला प्रकार सांगितला, सुश्रुत दादाने त्याच्या बाटलीतील पाणी पाजलं आणि पाठीवरून हात फिरवत "शांत हो ,घाबरू नको" म्हणून समजावत होता, तेव्हा मी ५वी-६वीत असेन.. त्यावेळी सुश्रुत दादा तिथे आला नसता तर काय झालं असतं याचा विचार न केलेलाच बरा", "आई,सुश्रुत मामाने तर नेहमीच देवाप्रमाणे धावत येऊन रक्षा केलीय गं तुझी" रमा म्हणाली. "रमा अगदी बरोबर बोललीस तू,त्याने एक भाऊ म्हणून फक्त कर्तव्यच नव्हे तर त्यापलीकडेही खूप केलंय माझ्यासाठी,ते मला कधीच विसरता येणार नाही" .

पुढे बोलता बोलता रमाने हळूच एक फोटो बॅग मधून काढला, आईला दाखवावा की नको याच विचारात असताना तो रुक्मिणीच्या नजरेस पडलाच, फोटो पाहिल्यानंतर क्षणभर रुक्मिणीचा चेहरा खुलला होता, तो फोटो तिच्या आणि ऋत्विजच्या एका भेटीच्या वेळी ऋत्विजच्या मित्राने त्या दोघांच्या नकळत काढलेला होता, ज्यावेळी दोघांनीही एकमेकांना आपल्या प्रेमाची कबुली दिली होती, त्यावेळच्या त्याच्या पहिल्या स्पर्शाने मोहुन टाकणाऱ्या त्या क्षणांच्या आठवणीत ती पुन्हा एकदा हरवली होती, पण क्षणातच हा सगळा भूतकाळ होता हे तिला जाणवलं आणि रुक्मिणी रडायला लागली,"त्याला जाऊन इतकी वर्ष झाल्यावरही त्याच्या स्पर्शाचे भास अजुनही तसेच कायम होताहेत" रुक्मिणी सांगत होती,आज रमानी तिला जवळ घेतलं होतं, रुक्मिणी अक्षरशः लहान मुलासारखी रमाला बिलगून रडत होती,रमानी तिची मान रुक्मिणीच्या डोक्यावर ठेवली आणि तिला हाताने थोपटत होती. आज रमा रुक्मिणीची आई झाली होती,पण रुक्मिणीला तिच्या स्पर्शात ऋत्विजचा भास होत होता,..थोड्यावेळाने ती शांत झाली तेव्हा तिने स्वत:ला सावरलं.

ती म्हणाली "रमा तुझ्या लग्नानंतर आम्ही दोघांनी सोबत घालवलेल्या त्या प्रत्येक क्षणाच्या आधारावरच मी आज जगतेय गं", तोवरचा सगळा वेळ तर संसाराच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यातच गेला होता, खऱ्या अर्थाने एकमेकांसाठी जगायला लागलो होतो ते मागच्या काही वर्षांतच,आता आम्हीच एकमेकांचे मित्र,शिक्षक, मार्गदर्शक,पालक आणि प्रेमवीरही होतो..पण मी ही सगळी नाती ज्या एका व्यक्तीभोवती गुंफली होती, ती त्या व्यक्तीबरोबरच संपलीत, आता उरले ती फक्त मी आणि मीच..एका विशिष्ट वयानंतर जोडीदार म्हणजेच नवरा -बायको हेच एकमेकांसाठी सर्वस्व असतात,तेच त्यांचं जणू संपूर्ण विश्व असतं.. पण दोघांच्यातल्या त्या छोट्याशा विश्वाची संपूर्ण स्वर्गानुभूती त्यांना घेता यावी यासाठी दोघांनाही दोघांच्याही शेवटच्या श्वासापर्यंत एकमेकांसोबत राहाता येईल अशी तरतूद देवाने आतापर्यंत केलेली नाही याचंच दु:ख वाटतं गं, आनंदाचे क्षण आठवणीच्या कुपीत जपून ठेवण्यासाठी,त्या आनंदाच्या प्रसंगी खांद्यावर हात ठेवून फोटो काढायला, संकटाच्या वेळी कुणी जरी पाठ फिरवली तरी हातात हात घेऊन 'मी आहे तुझ्यासोबत' असा विश्वास द्यायला, मनात दाटलेल्या दु:खाला वाट मोकळी करून द्यायला आपल्या माणसाचा हक्काचाच खांदा हवा असतो गं , वाढत्या वयाबरोबर चालताना अडखळणाऱ्या शरीराला सावरण्यासाठी, जेवतांना

लागणाऱ्या ठसक्यावर थरथरत्या हाताने का होईना पण पाणी पाजण्यासाठी,आजारी असताना 'लवकर बरं होऊ दे' म्हणून देवाला प्रार्थना करण्यासाठी,हातात हात धरून फिरायला जाण्यासाठी, मनाप्रमाणे घडलं नाही म्हणून या वयातही रुसलेल्या जोडीदाराला मनवण्यासाठी,मूड ऑफ झालाच तरी जुन्या आठवणी सांगून खळखळवून हसवण्यासाठी आपलाच माणूस हवा असतो गं,रमा अगं वाढत्या वयाबरोबर माणसाला लागणाऱ्या सहवासिक आणि मानसिक आधाराची गरजही वाढतीच असते.आपल्या जोडीदाराचा तो आधाराचा,खात्रीचा, विश्वासाचा आणि प्रेमाचा स्पर्श आपलं जगण्याचं बळ, जगण्याची उमेद वाढवत असतं, आणि आपला आत्मविश्वास वाढवणारा आपल्या जोडीदाराचा 'स्पर्श' च आपलं जीवन सार्थ ठरल्याची कबुली देत असतो.."आज रमा रुक्मिणीचं बोलणं अगदी लक्षपूर्वक ऐकत होती कारण तेच वास्तविकदृष्ट्या सत्य होतं.......!

- सौ. तृष्णा आंबेकर

# एकाच या जन्मी जणू

आज सकाळपासूनच का कोण जाणे पण सगळंच खूप वेगळं वाटतंय. नाही...नवीन असं काहीच नाहीये..सगळंच तर जुनं आहे...माझ्या पहाणीतलं..माझ्या ओळखीचं असं! तेच घर, तिच माणसं, त्याच भिंती, तिच कपाटं.. सगळं सगळं तेच! बहुदा मगाशी डोळ्यांपुढे अंधारी आल्यामुळे धास्तावल्या सारखं तर नाही होतंय ना आपल्याला..? मनात असे असंख्य विचार होते. त्याच विचारांच्या विचारात मी खोलीत गेले. माझी खोली..पण..आज ती पण जरा वेगळीच वाटत होती. खरंतर जरा पडावं या विचाराने खोलीत आली होती. पण तिलाही आज डोळ्यात साठवून ठेवावसं वाटलं! तिचा प्रत्येक कोपरांकोपरा अगदी पहिल्यांदाच बघतेय असं कोणाला वाटावं अशी मी माझ्याच खोलीत बघू लागले..वावरू लागले.. बस आत्ता दाराच्या दिशेने वळून बाहेर पडणार तितक्यात त्या कोपऱ्याकडे माझं लक्ष गेलं.

अरे हो! तुमच्यासाठी नवीनच नाही का सगळं! लक्षातच नाही आलं माझ्या..जुन्या गोष्टींमध्ये आपण नव्याने गुंतायला लागलो की हे असं होतं बघा! तर.. तो कोपरा म्हणजे माझा study table. माझी सगळ्यात आवडती जागा आहे ही! सगळं नवीन आणि वेगळं वाटत असलं तरी या कोपऱ्याने तो आपलेपणा जपला होता! असं म्हणतंच नकळत मायेने हात फिरवला गेला त्या टेबल वरून. अरेच्या! ही तर माझी डायरी!

आयुष्याच्या पुस्तकाची पानं पलटवत एक एक अध्याय संपत होता. त्यात येणाऱ्या कडू गोड प्रसंगांची आधी साक्षीदार आणि नंतरची माझी साथीदार म्हणजे ही डायरी. खरंतर एकदा पलटवलेलं पान उल्थावयचं नाही असं नेहेमी मीच म्हणते..पण जरा चाळावी ही डायरी असं आज वाटून गेलं..एक त्रयस्त म्हणून आपल्याच आयुष्याकडे पहतांना मला सुरवाती पासूनच सगळं अगदी स्पष्ट दिसायला लागलं होतं.. आमचा तो महाल मधला वाडा..त्याच्या मागच्या बाजूला असलेलं हनुमानाचं आणि महादेवाचं छोटंसं मंदीर..त्याला लागून विहीर.. विहिरीलाच लागून असलेली पापायीची झाडं..आणि तिथे बागडणारी छोटीशी मी..

एखाद्याच्या स्वप्नातलं सुखी कुटुंब असावं अगदी तसंच होतं माझं कुटुंब! पण नंतर वाडा सुटला आणि सगळंच चित्र बदललं. आमचं वाडा सोडून जाणं बहुदा आवडलं नसावं हनुमंताला आणि महादेवाला..

लहान वयातच आयुष्यातले खूप महत्त्वाचे धडे शिकले मी.. आत्ता मोठं झाल्यावर बऱ्यापैकी समजायला लागल्यावर आपण म्हणतो.. Nothing is permanent वगैरे..पण हे खूप आधीच मला नियतीने शिकवलं होतं..माझ्या नकळत्या वयातच! काही गोष्टींची किंमत कळण्या आधीच चुकवली होती मी..बरेचदा असं वाटायचं की हे असं आपल्याच सोबत का? झालेलं सगळंच नाही का बदलवता येणार वगैरे वगैरे..पण शेवटी आहे ते मान्य करून पुढे जाण्याशिवाय आपल्याकडे कोणताच पर्याय नसतो..

माझ्याकडेही नव्हता.. कदाचित त्यामुळेच जे आहे जसं आहे तसं आणि तसंच बघण्याची आणि accept करण्याची सवय लागली असावी मला..

दिवसा मागून दिवस जात होते..वर्षेही अगदी तशीच सरत होती..आणि सरता सरता नवीन गोष्टीही शिकवत होती..

काल परवा पर्यंत अंगणात फ्रॉक घालून बागडणारी मी आत्ता jeans top घालून मैत्रिणींबरोबर outing वगैरे करायला लागली होती..स्वतःच्याच विश्वात रमायला लागली होती..बहुतेक मोठी होत होती मी..नव्हे नव्हे झालीच होती!

मोठं होण्याचं अजुन एक लक्षण म्हणजे प्रेमात पडणं..म्हणजे असं मला वाटतं..

आपल्याला कोणी तरी आवडायला लागेल किंवा आपण कोणाच्या तरी प्रेमात पडू असं मला कधीच वाटलं नव्हतं...पण झालं गड्या तसं! पडले मी त्याच्या प्रेमात! अगदी त्याला पाहताच क्षणी! हळू हळू ओळख झाली..गाठीभेटी वाढल्या आणि पांढऱ्या शुभ्र घोड्यावरून येणारा हाच तो आपला राजकुमार याची खात्री पटली.. मग काय..आयुष्याच्या नव्या अध्यायाचा शुभारंभ झाला..जोडीनी..

हवा तसा नवरा मिळाला हवी तशी माणसं मिळाली...सगळंच हवं तसं घडत होतं..सुख म्हणजे नक्की काय याचा प्रत्यय येत होता..माझ्याच फुललेल्या संसाराला माझीच दृष्ट लागते की काय असंही वाटत होतं..

तो वरून जितका rough and tough होता आतून तितकाच हळवा होता..actually थोडासा filmy आणि वेडाही होता..

एका संध्याकाळी चहा पीत असतांना अचानक मला म्हणाला, "राहशील ना अशीच कायम माझ्यासोबत? सोडून नाही ना जाणार?"

मी त्याच्याकडे पाहतच राहिले! पण हे बोलत असतांना त्याच्या डोळ्यात आलेलं पाणी पाहून मी मात्र नकळत मनोमन सुखावले..

मी पुढे काही तरी बोलणार तितक्यात त्यानीच विषय बदलला. मग काय..रंगलेल्या गप्पांमध्ये हे कुठेतरी राहूनच गेलं. पण मनातून मात्र काही केल्या जात नव्हतं. पुन्हा कधी तरी वेळ पाहून आपणच हा विषय काढू आणि त्याच्याशी बोलू असं मी ठरवलं..पण काय करणार..पुन्हा एकदा ती वेळ येण्यापूर्वीच निघून गेली होती..त्यामुळे त्याला हे असं अचानक का वाटलं असेल हे मात्र माझ्यासाठी कायमचं कधीही न सुटलेलं कोडंच राहिलं..

असो! काही प्रश्न अनुत्तरितच बरे असतात!

जे आहे जसं आहे तसं स्वीकारण्याच्या सवयीमुळे हे ही आहे तसं स्वीकारलं आणि पुढे जात राहिले..

आज ही डायरी सापडल्यामुळे आठवणींवर बसलेली धूळ झटकल्या गेली आणि सगळ्या कडू गोड आठवणी पुन्हा एकदा चकचकीत झाल्या!

एकदा पलटवलेली पानं आज पुन्हा एकदा उलटवतांना डोळ्यात आसू आणि ओठात हसू होतं..एक त्रयस्त म्हणून आपल्याच आयुष्याकडे पाहतांना अशक्य वाटणारंही बरंच काही आपण शक्य केल्याचं समाधानही सोबतीला आलं.

आत्ता तेच समाधान उराशी बाळगून मी हॉलमध्ये गेले आणि कोपऱ्यात लावलेल्या उदबत्तीच्या शेजारी जाऊन बसली..आणि तेव्हा कळलं की आज का सगळं वेगळं वाटतंय!

सततच्या पुढे जाण्याला आत्ता विराम द्यायची वेळ आली होती..पण स्वल्पविराम द्यावा का पूर्णविराम हेच कळत नाहीये.. त्यामुळे याला आत्ता प्रवासाची पूर्तता म्हणायची का नवीन प्रवासाची सुरुवात..?!

- कु. स्वर्णिमा कमलवार

# मला खूप शिकायचंय..!

प्रवास म्हटला की सगळ्यांसमोर उभा राहतो तो निसर्ग आणि निसर्गाशी साधलेला संवाद . प्रवास म्हणजे निसर्ग न्याहाळणे अशी साधारण व्याख्या आहे . प्रवासात कोणाचा तरी सहवास महत्त्वाचा वाटतो .एखादे प्रेक्षणीय स्थळ पाहताना आपल्याला सहवास लागतो तो डोंगर , दर्या , निखळपणे वाहणारा झरा झाडांची गर्दी असणाऱ्या घनदाट जंगलांचा , ऐतिहासिक , धार्मिक आणि प्रेक्षणीय थंड हवेच्या ठिकाणचा प्रवास आपण आपला मित्रांबरोबर भावंडांसोबत करीत असतो.

पण प्रवास वेगवेगळ्या अंगाने ही होत असतो . निसर्गाच्या पलीकडे एक महत्त्वाचा प्रवास म्हणजे आयुष्याच्या प्रवास . माझ्या आयुष्याचा आत्तापर्यंतचा प्रवास लहानसाच आहे . भविष्याचा प्रवास अद्याप शिल्लक आहे आणि बराच मोठा टप्पा अजून गाठायचा आहे.

मनाची भाषा कळायला लागल्यावर स्वत:शीच एक संवाद सुरू झाला आणि हळूहळू कळत गेले की , मनाशी संवाद साधणे खूप महत्त्वाचे असते त्यामुळे अनेक प्रश्नांना वाचा फुटली आणि उत्तरांना ही दिशा मिळत गेली . माणसे कळू लागली आणि ती वाचता देखील येऊ लागली . निसर्गाचा असतो तसाच आयुष्याचा देखील खूप मोठा प्रवास असतो.

निसर्गाच्या प्रवासात आपण अंतर गाठत असतो तर , आयुष्याच्या प्रवासात भावनिक , वैचारिक , मानसिक अशा अनेक वेगवेगळ्या अर्थाने आपण अंतर गाठत असतो . आयुष्य समृद्ध करण्याची ही एक प्रक्रिया आहे . सुख , दु:ख , द्वेष , समाधान , आनंद , भीषणता ,भयानकता ,

हतबलता अशा कितीतरी भावनांना आपण सामोरे जात असतो . माझाही असाच छोटासा एक प्रवास जो मी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे .

शालेय शिक्षण झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणाचा माझा सुंदर प्रवास सुरू झाला, आहे . तसे मला लहानपणापासूनच संगीताची आवड असल्याने आई-बाबांनी मला संगीत शिकण्यासाठी धाडले . जसजसे माझे महाविद्यालयीन जीवन सुरू झाले तसतसे माझ्यातील काही गुढ कला मला माझ्याच उमगायला लागल्या . मला मोठमोठ्याने कविता , सुभाषिते , श्लोक वाचायला खूप आवडतात .भाषण द्यायला किंवा कथा सांगायला सुद्धा . हे सारे काही महाविद्यालयात गेल्यावर करायला लागले . त्याच बरोबर हे देखील कळले की, आपण निवेदनही छान करू शकतो आणि मी त्या मार्गाने माझा प्रवास देखील सुरू केला. महाविद्यालयात स्पर्धांमध्ये निवेदन करायला सुरु केले . काही त्रुटी समजून घेऊन त्यावर काम सुरू केले , अजूनही करते आहे .मला अजूनही आठवत २०१८ ला दिवाळी पहाट माझा पहिलावहिला व्यावसायिक कार्यक्रम ज्यात मी पहिल्यांदा निवेदन केले आणि तो कार्यक्रम खूप छान रंगला सुद्धा.

अर्थात तो माझा पहिलाच कार्यक्रम असल्यामुळे अनेक गोष्टी अनुभवल्या आणि त्यावर मोठ्यांचे आणि जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन सुद्धा घेतले . त्यानंतर मी अनेक कार्यक्रमातून माझा निवेदनाचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू केला . २०१९ ला मी एक मोठा धाडस केलं ते म्हणजे स्वता:च कार्यक्रम आयोजित करून त्याचे व्यवस्थित नियोजन करणे .अर्थात माझ्या सोबतीला आमची सर्वांची लाडकी सायली ताई होती म्हणूनच ते शक्य झालं . आजही तो प्रवास आठवताना आम्ही एकमेकांना हसत म्हणतो , सायली ताई तुला आठवतंय का, आपण स्वत: हॉलमध्ये जाऊन संपूर्ण हॉल स्वच्छ करून सजवला आणि दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाला पुन्हा सज्ज झालो . आणि हा अनुभव तर माझ्यासाठी आयुष्यातला खूप म्हणजे खूपच महत्त्वाचा असणार आहे . माझ्या आयुष्याच्या पुढच्या प्रवासासाठी नक्कीच या अशा अनेक अनुभवांची साथ मिळेल . आयुष्याचा प्रवास खूप सुंदर आहे आणि आनंददायी देखील असतो.

कवी सुरेश भट म्हणतातच ना -

**" आयुष्य छान आहे , थोडे लहान आहे**

**रडतोस काय वेड्या ....? लढण्यात शान आहे ! "**

अगदी असंच काहीसं माझं देखील या काही मधल्या काळात झालं होतं पण कवींच्या या ओळींनी उभारी दिली आणि पुन्हा एकदा मी नवीन प्रवासाच्या शोधात -

**" मला खूप काही शिकायचंय**

**जीवन जगेन आनंदाने असं यश मिळवायच आहे !**

**मला खुप काही शिकायचंय**

**कथा-कविता, शब्दावाचुन भाव व्यक्त करायला**

**मला खूप काही शिकायचंय**

**शब्दांच्या सुंदर दुनियेत मला डोकावून पाहायचंय !**

**मला खूप काही शिकायचं आहे "**

- कु. निर्मिती रा .देवलसी

# प्रवास 'स्व'त्वाचा...

जो व्यक्ती संगीतातून, स्वतःवर, इतरांवर आणि स्वतःच्या आयुष्यावर निःस्वार्थ प्रेम करायला शिकेल तोच खरा संगीतप्रेमी, असं मला वाटतं.

संगीत प्रेम हे अगदी सोज्वळ,  निःस्वार्थ, निरागस आणि माया लावणारं आहे असं नक्कीच म्हणता येईल. अगदी कुणाला गाता येत असो वा नसो, संगीत  कळत असो वा नसो, पण ती अलगद कानावर आलेली स्वरांची लहर फार सुखद क्षण घेऊन, आनंद देऊन जाते हे तितकच खरं! आणि हीच लहर

मी लहानपणापासून जगत आलीये. माझा संगीताकडे असलेला कल, संगीतावर असलेलं माझं चिकार प्रेम बघून, संगीताचा मार्ग निवडण्याची संधी माझ्या कुटुंबियांनी मला दिली.

वय लहान असल्यामुळे ओझं ही कमीच होतं. शाळेचे सुखदायक निरागस दिवस होते आणि त्यात भरात भर म्हणजे माझ्या आयुष्याला जोडल्या गेलेला न वगळता येणारा तो सुखाचा संगीताचा तास...

त्या दिवसांमध्ये काय आणि किती शिकायला मिळालं, मी संगीताला किती जाणुन घेऊ शकले, संगीत आणि माझं आयुष्य ह्याचा संबंध कसा जोडू शकले.. हे सगळं शब्दबद्ध करण्याच्या पलीकडलं.

हेच सुखाचे, शांततेचे, रमणीय दिवस सरता सरता माझ्या शैक्षणिक जीवनाचे महत्त्वाचे तीन वर्ष समोर येऊन उभे राहिले ते म्हणजे दहावी, अकरावी आणि बारावी. या तीन वर्षांत संगीतातून मी पूर्णपणे स्वतःला वगळलं होतं. पण हे तितकंच खरं की रियाज जरी नव्हता तरी गाणं ऐकून मनाला अत्यानंद होऊन समाधान मिळत असे.

आयुष्याचा हा टप्पा संपत नाही तर दुसरा महत्त्वाचा टप्पा आला ज्यानं माझं शैक्षणिक आयुष्य स्थिर होणार होतं.  एकंदर काय तर

करियर, graduation पूर्ण करण्याची जबाबदारी. या काळात माझा आणि संगीताचा फारसा संबंध नव्हताच उरला अगदी पुर्वी शिकलेलं, रियाजलेलं, याचा विसर पडेपर्यंत आणि स्वतःचा विसर पडेपर्यंत कारण गाणं आणि मी हे कधी दूर होण्याचा विचारच करू शकत नव्हते मी.

संगीत प्रेमींवर अशी वेळ कधीही न येवो !

कुठे ना कुठे संगीत माझ्यापासून दुरावल्याची खंत आतपर्यंत खोल मनामध्ये रुजल्या गेली होती. तीच खंत माझी ताकत बनवण्याची जिद्द माझ्या मनात होती आणि संगीताचा कण, गंध असल्यामुळे मी पुन्हा लग्नानंतर   त्या परमानंद देणाऱ्या संगीताच्या सानिध्यात आले.

खरंतर लग्नाआधीचा प्रवास आणि लग्नानंतरचा प्रवास ह्यात फार मोठं अंतर.

लग्ना नंतर एका गृहिणीला तिचे छंद, आवड निवड जोपासण्यासाठी एका समजूतदार नवऱ्याची साथ लाभणं हे क्वचितच घडतं पण या बाबतीत मी स्वतःला नशीबवान समजेल की माझ्या साथीदाराने मला दिलेली साथ माझ्या 'स्वत्वाकडे' नेण्यासाठी ठरली. खरंतर माझ्या यजमानांनी मला दिलेला पाठींबा अगण्य आहे.

एखाद्याचं नशीब फळफळतं तेव्हा असं समजावं की सगळं काही दृष्ट लागण्या सारखं सुरू आहे आणि त्यात माझ्या आयुष्यात अगदी ते म्हणतात ना 'सोनेपे सुहागा' अगदी तस्सच घडलं...

माझ्या आयुष्यात माझ्या संगीताच्या साथीला मला लाभले ते आपल्याकडे असलेलं संपूर्ण ज्ञान शिष्याला देणारे, आणि संगीतावर निःस्वार्थ प्रेम करायला शिकवणारे गुरू लाभले. माझ्या आयुष्याचा अर्थ बदलतोय हे मी नक्की सांगेन.

असं म्हणतात ना की अनुभवातूनच माणुस घडत जातो, मलाही अनुभवातून बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या

किशोरवयीन ते प्रौढवयीन या दरम्यानच्या प्रवासानं मी शहाणी होत गेली.

माझ्या गुरूबद्दल बोलायचं झालं तर मी हे गर्वाने सांगेन की आज जे काही मी जाणते आहे, अनुभवते आहे , माझ्या स्वभावात सुद्धा बरेच सकारात्मक बदल घडत आहेत ते केवळ माझ्या गुरूंच्या सान्निध्यामुळे.

आदर्श गुरू बनण्यासाठी अनुभव दांडगा लागतो, विषयाची सखोल माहिती तुम्हाला असावी लागते, जे काही तुमच्याकडे आहे ते पूर्ण ज्ञान तुम्ही समोरच्याला देऊ करत असाल तर एक विश्वसनीय शिष्य तयार होतो आणि यावर माझा ठाम विश्वास बसलाय.

गुरूंनी आपल्यावर दाखवलेला विश्वास जगण्याची नवीन उमेद देऊन जातो... !

"कला आपल्याला घडवत नाही तर आपण कलेतून घडतो" अशा परिपक्व  असलेल्या विचारसरणीचा गुरू आपल्याला लाभला तर मरेपर्यंत शिकता येतं. शिक्षण घ्यायला वयाची बांधिलकी नाहीच हे आपल्याला माहित आहेच.

मला असं वाटतं की जीवनाचे टप्पे जसजसे जातात तसतसा माणुस ही परिपक्व घडत जातो.

जीवनात ध्येय तर आयुष्याला वळण लागतं. आणि ते ध्येय गाठायची म्हणणार नाही मी तर ते जगायची संधी मला लाभली आहे ती माझ्या गुरूंमुळे.

हरवलेल्या मला मी स्वतः जरी गवसली तरी समाधानाने डोळे बंद करून माझा 'स्वत्वाचा' प्रवास अधिक सुखकर आणि परमानंदाचा अनुभव देणारा ठरेल यात काही शंका नाही.

- सौ. अपूर्वा भालेराव

# निरंतर प्रवास

प्रवास हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अविभाज्य घटक आहे. ह्या जगात अस कोणीच नाही ज्याने प्रवास केला नाही. कधी ना कधी, कुठल्या ना कुठल्या कारणासाठी, जवळचा किंवा लांबचा , नियोजित वा स्वच्छंदी असा कुठलातरी प्रवास प्रत्येकानेचं केला आहे. मातेच्या गर्भाशयातून या जगात येणे माणसाच्या आयुष्यातला पहिला आणि सगळ्यात सुंदर प्रवास. या प्रवासाची सुरुवात झाल्याशिवाय इतर प्रवासाला आपल्याला निघता येत नाही.

माणसाच्या आयुष्यातही सुख दुःखाचा प्रवास कायमच सुरू असतो. सुखा पाठोपाठ दुःख तर दुःखा पाठोपाठ सुख हे येतचं. त्याच मुळे आयुष्य जगण्याला खरा आनंद मिळतो.

प्रवास म्हणजे फक्त या जागेहून त्या जागेवर जाणे का? अह् ! प्रवास हा कुठल्याही एका प्रकारचा नसतो. प्रवास हा कधीही न संपणाऱ्या चित्रपटासारखा असतो. ज्याचा निर्माता, दिग्दर्शक तो परमेश्वर असतो. आपल्याला फक्त त्याने दाखवलेल्या रस्त्यावर प्रवास करायचा असतो. रस्ता जरी त्यांनी निर्धारीत केलेला असला तरी तो प्रवास कसा फुलवायचा, तो करा चालायचा हे ठरवण्याची मुभा मात्र त्याने आपल्याला मुक्त हस्ताने दिली आहे.

प्रवास आणि प्रवासी ह्या दोघांचे एक वेगळे आणि अतूट नाते आहे. दोघेही एकमेकांशिवाय अपूर्ण आहे. आपल मनही एक प्रवासी आहे. एक असा प्रवासी जो अनेक युगांपासून सतत, निरंतर आणि कायम वेगवेगळा प्रवास करतो आहे. किडे कीटक, जलचर, स्थलचर, दृष्य अदृष्य अश्या अनेक मार्गांवरून आपले मन प्रवास करत असते. आपल्या कडिज मानले जाते की ६४ योनींनमधून जन्म घेतल्या नंतर हा मनुष्यजन्म प्राप्त होतो. जे योनी म्हणजे तरी नेमक काय हो? एक प्रकारचा प्रवासच की. या देहातून त्या देहाकडे चालत जाणारा प्रवास. ह्या प्रवासाला आयुष्य असे नाव. मनाने ज्या देहात जितका प्रवास केला तितक त्या देहाचं आयुष्य अस म्हणायला हरकत नाही.

मन प्रत्येक प्रवासात काही ना काही कायम अनुभवत असतो. प्रत्येक वेळेला येणारे अनुभव हे वेगळे आणि नवीन शिकवून जाणारे असतात . आणि म्हणूनच मनाचा प्रत्येक वेगळा आणि आकर्षक असतो. ६४ योनीतून फिरून मानव जन्म जगणे म्हणजे या भुतलाची १ प्रदक्षिणा, वारी पूर्ण होणे अस म्हणता येईल. प्रत्येक देहातून प्रवास करत , काही काळ तेथे विसावत हे मन पुढे मार्गक्रमण करत असते. वेगवेगळ्या प्रवासातील अनुभव गाठीशी घेत तो मानव देहाच्या प्रवासाला निघतो आणि मागील प्रवासातील अनुभवांच्या मदतीने हा पूर्णत्या चा प्रवास फुलवत जातो. माणसातील उपजत गुण , स्थायी स्वभाव म्हणजे नेमकं काय तर हेच मागील प्रवासातील अनुभवाचे प्रतीक. एखाद्या प्रवासात आलेला प्रसन्न दयी अनुभव आपण ह्या जन्मी गुण म्हणून जतन करतो तर आपल्या वाट्याला आलेला वाईट अनुभव अवगुण म्हणून आपल्या वागण्यातून प्रकट होतो.

मनाच्या प्रवासाचे उत्तम उदाहरण म्हणजे पुर्नजन्म . पुर्न जन्म म्हणजे  मनाने केलेला तोच प्रवास पण वेगळ्या मार्गाने. आपण म्हणताना म्हणातोच की ,' अमुक एक बाळ अगदी आपल्या आजोबांवर गेलाय त्याची प्रतिकृतीच जणु. आपले एकमेकांशी पूर्वजन्मी चे  ऋणानुबंध  असतात कारण या पूर्वीचा कुठला तरी प्रवास ह्या मनाने एकत्र केलेला असतो. म्हणूनच आपल्याला या अब्जावधी लोकसंख्या असलेल्या जगात ती एकच व्यक्ती सगळ्यात जास्त जवळची वाटते. ह्या मनाचा प्रवास कधी सुरू झाला हे आपल्याला माहिती नाही आणि ह्याचा अंतही आपण जाणू शकत नाही. जोवर हे जग, तो परम पिता परमेश्वर आहे तोवर हा निरंतर प्रवासी आणि हा निरंतर प्रवास आहे.

- सौ. मृण्मयी सारंग

# स्वयंप्रकाशी तू तारा..

रोजच्या ठरलेल्या साचेबद्ध आयुष्यात दरदिवशी काहीतरी नवीन आव्हानं म्हणा जबाबदाऱ्या म्हणा या येतात. माणूस म्हंटलं की त्याचे दोन खांदे म्हणजे कर्तव्य आणि जबाबदारी या नावाचे असावेत असं मला कायम वाटतं. पण यातलं मला असं काहीही नाही, म्हणजे म्हंटलं तर आहे, म्हटलं तर नाही...! मला असा एक ठरलेला देह नाही, रंग नाही, आकार नाही, रूप नाही इतकंच काय तर माझं स्वतःचं असं घर सुद्धा नाही. मी स्वैर मुक्त आणि स्वच्छंदी. मला मोकळ्या वातावरणात फिरायला खूप आवडतं.

सगळं सगळं विसरून फक्त मुक्तपणे संचार करायचा.एक दिवस सहजच कुठेतरी जायचं म्हणून मी निघालो. मला देह आकार रूप रंग घर नाही ना त्यामुळे मला कुठेही जाण्याची मुभा आहे. माझ्यातली एक गंमत म्हणजे मला कुठेही फिरता येतं अगदी पत्ता नसला ना तरी मी जिथे जायचंय तिथे अगदी अचूक पोहोचतो. असंच एकदा सगळी मरगळ कंटाळा झटकून मी फिरायला जाण्याचं ठरवलं. या माणसांच्या गर्दीत न फिरता दूर कुठेतरी निघून जावं असं वाटलं, निश्चय केला आणि मी निघालो ..

खरं सांगायचं तर त्यादिवशी खूप प्रसन्न आणि मस्त वाटतं होतं. माझं एक बरंय मला भटकंतीला कुठल्याच साधनाची गरज नसते. जे मिळेल त्यानी मी निघतो. तर त्यादिवशी मी मजल दरमजल करत करत निघालो. माझ्या वाटेत खूप छान छान ठिकाणं मी पाहिली. गर्दरान, मोठी मोठी हिरवीगार झाडं, रानमेवा अशा सर्वांगसुंदर वातावरणात मी अक्षरशः घुसखोरी केली आणि तिथलं ते निसर्गसौंदर्य बघून मी तर हरखूनच गेलो. किती निरव शांतता होती तिथे! तिथल्या शांततेला सुद्धा एक नाद होता लय होती. निसर्गाच्या सान्निध्यात असलं की सगळ्या जगाचा विसर पडतो असं मी कुठेतरी ऐकलं होतं ते आज मी अनुभवत होतो. सगळं अगदी साठवून घेत होतो माझ्या स्मृतीत...!

माझ्या स्मृतींच्या पानांमध्ये खूप साठा होता तो निसर्गाचा, तिथल्या सौंदर्याचा. वेगवेगळे पक्षी, वृक्ष बघतांना मला हे टिपू की ते टिपू असं होत होतं. मधेच प्रश्न पडायचा की, प्रत्येक पक्ष्याला त्याचं त्याचं सौंदर्य आहे मग ते आपलं सौंदर्य कसं न्याहाळत असतील? इथे असेल का कोणता आरसा? असा प्रश्न मला पडताच क्षणी माझं लक्ष गेलं ते तिथे वाहणाऱ्या नदीकडे...! आकाशात उडणारे पक्षी तिच्या पाण्यात अगदी स्वच्छ दिसत होते. मला उत्तर मिळालं की हाच यांचा आरसा. अगदी आकाशापासून ते तिथल्या झाडांपर्यंत सगळं त्या आरशात दिसत होतं... पण मी? छे मी कसा दिसणार? मला कुठे रूप? जिथे रूप नाही तिथे आरसा हवा कशाला? मी प्रवास करून दमलो होतो पण मला आलेला शीण या निसर्गाच्या सौंदर्याने पार दूर पळाला. सगळं गर्दरान पाहिल्यावर मी जरा विसावलो नदीच्या काठावर..तिचं रूप शांत होतं. निर्मळता तिचा मुख्य गुण ती सुद्धा एका लयीत वाहत होती. मी उगीचच तिच्यात आणि माझ्यात साम्य शोधत बसलो. ते साम्य मी पुढे सांगेलच पण आधी जरा मी तिथली संध्याकाळची शोभा सांगतो..

संध्याकाळ झाली तसे सगळे तिथे राहणारे प्राणी पक्षी आपापल्या घरी परतत होते. अगदी मुंग्यांपासून ते हत्तीपर्यंत मी सगळ्यांना अगदी निरखून बघत होतो. प्रत्येक किटकाचं सुद्धा एक सौंदर्य होतं. या सगळ्यांमध्ये मी एक गंमत बघून हबकूनच गेलो. सगळे पशु पक्षी आपल्या घरी गेले मी मात्र त्या निरव शांततेत रमलो होतो. तेव्हा माझ्या दृष्टीस पडला एक प्रकाश जो सगळीकडे फिरत होता. एका ठिकाणी स्तब्ध नव्हता मला मोठी गंमत वाटली एरवी आपण इकडेतिकडे फिरतो पण प्रकाश स्तब्ध असतो पण इथे उलटंच घडत होतं मला कुतूहल वाटलं. मी त्या टिमटिमणाऱ्या प्रकाशाचा माग घेऊ लागलो. कदाचित त्याला असं जाणवलं की,कोणीतरी त्याचा पाठलाग करतंय असं वाटून त्याने मागे वळून पाहिलं. मी होतो पण त्याला दिसत नव्हतो..हां पण माझा आवाज मात्र  तो ऐकू शकत होता.. त्याला मी जरा आश्वस्त केलं. आणि त्याच्याशी संवाद साधायला सुरुवात केली..

मी म्हणालो, " तू किती वेगळा आहेस रे? म्हणजे प्रथम दर्शनी तुला बघून मला जरा आश्चर्यच वाटलं. तू जिथे जिथे जातोस तिथे तिथे तुझा प्रकाश तुझ्यासोबत असतो. तुला पाहून  मला हेवा वाटला. मला का नाही असा स्वतःचा प्रकाश? स्वतःचं असं अस्तित्व? माझ्या नशिबी फक्त प्रवास लिहिलेला तो सुद्धा ठराविक नाही. तुझं तसं नाही. तुला एक घर आहे, तुझं रूप आहे रंग आहे आकार आहे सगळं आहे. मला असं काही नाही.. हेच बघ ना मी कधी खूप आनंदी असतो तर कधी दुःखी. कधी राग येतो कधी खूप घृणा वाटते नेमकं असं काही नाही.माझ्या अस्तित्वाचं मलाच कधीकधी कोडं पडतं. आणि असे प्रश्न पडतात ज्याची उत्तरं कधी सापडतात तर कधी ते प्रश्न निरुत्तरीतच राहतात…!

हे  सगळं ऐकून तो टिमटिमणारा प्रकाश मला म्हणाला,

" अरे मना.!किती रे प्रश्न तुझे?तुला माहितेय तुझा जन्मच मुळी प्रवासी म्हणून झाला आहे. तुला रंग रूप नसलं म्हणून काय झालं? तुला संवेदना .आहेत हे विसरू नकोस. आणि बरं का आज तुझ्या प्रश्नांची माझ्याकडे उत्तरं आहेत आणि ती मी तुला  देणार आहे. /तुला माझ्या प्रकाशाचं अप्रूप वाटलं ना? अरे तसाच एक प्रकाश तुझ्यात सुद्धा आहे. जो या प्रकाशापेक्षा श्रेष्ठ आहे. तुला डोळे नसले म्हणून काय झालं? पण तुला मनःचक्षु  आहेत जे माझ्यासारख्या दिसणाऱ्या डोळ्यांपेक्षा महत्वाचे आहेत. तू प्रत्येक सजीवाच्या ठिकाणी आहेस मग तुला राहायला घर नाही असं का म्हणतोस? मला माहितेय तू अशांत होता म्हणून इथे निघून आलास. तुला म्हणून सांगतो ही एकमेव जागा अशी आहे जिथे कितीही ताण घेऊन आलं तरी या वातावरणात तो ताण विसरायला होतो. आणि प्रश्न राहिला माझ्यात असलेल्या प्रकाशाचा तर  तुझ्यात सुद्धा स्वतःचा असा प्रकाश आहे जो नव्या स्वप्नांचा आहे नव्या उमेदीचा आहे. त्या स्वप्नांच्या प्रवासाचा आहे तेव्हा तू सुद्धा स्वयंप्रकाशी आहेच माझ्यासारखा…! त्याचं हे बोलणं ऐकून मी एक नवीन भरारी घेतली आणि खूप सकारात्मकता घेऊन मी उमेदीच्या प्रवासाला लागलो… आणि मी मागे म्हटलं तसं माझ्यातलं आणि नदीतलं साम्य म्हणजे तिचं नितळ पाणी जसं आरसा होतं तसंच मी सुद्धा एक आरसाच आहे तुमच्या भावभावनांना प्रतिबिंबित करणारा….म्हणजेच तुमचंमन..! आज या संवादाने का होईना काजव्याप्रमाणे मन सुद्धा स्वयंप्रकाशी झालं होतं एका तेजस्वी ताऱ्यासारखं…!

- सौ. सायली देशपांडे

# कळीचे फूल होतांना

स्वरा... अगं स्वरा... हे काय, तू शाळेतून आल्यावर काहीच खाल्लं नाहीस... रोहिणी ऑफिस मधून आल्या आल्या ओरडली....अगं आणि हे काय... uniform, shoes सगळं कसं अस्ताव्यस्त पडलंय....स्वरा काय म्हणतेय मी....आता मात्र रोहिणी चा पारा चांगलाच चढला होता. इतक्यात तिला स्वरा तंद्री लावून बसलेली दिसली. सातवीत असलेली स्वरा रोज सगळं काही शाहण्या मुली सारखं करायची, पण मग आजंच अशी का बसलीये हा प्रश्न रोहिणीला पडला... नक्कीच कसला तरी गहन विचार करतेय ही मुलगी.. ती पटकन किचन मधे गेली आणि टू मिनिट्स मॅगी, अगदी स्वराला आवडते तशी सूपी करून, त्यात केचप घालून, दोन bowls मधे वाढून, स्वराच्या खोलीत गेली. ओय स्वरा... काय... कुठे लक्ष आहे... अगं कधीची ओरडतेय मी, तू काही बोलतंच नाहीयेस... हे बघ तुला आवडते तशी सूपी मॅगी with टोमॅटो केचप आणलीये.. चल दोघी जणी खाऊन घेऊयात.... मला तर खूऽऽप भूक लागलीये. रोहिणी नी स्वराला मॅगी चा बाऊल दिला. स्वरा नी रोहिणी कडे बघितलं आणि एकदम तिच्या कुशीत शिरून रडायलाच लागली. रोहिणी च्या लक्षात आलं कि आज शाळेत नक्कीच काही तरी घडलय. तिनी स्वराला शांत केलं, डोळे पुसले, तिचा आवडता तारक मेहता लावला आणि दोघींनी मॅगी खाल्ली. खाऊन झाल्यावर रोहिणीनी सगळं आवरलं आणि ती स्वराच्या खोलीत गेली.... स्वरा बाळा आज शाळेत काही झालंय का? आज तू जेवली नाहीस, रोज जशी good girl सारखी सगळं आवरून ठेवतेस, तसं ठेवलं नाहीस...मैत्रिणीशी भांडण बिंडण झालंय का?

नाही गं आई, श्रुती आहे नं, आज तिच्या सोबत काही तरी विचित्रंच घडलं.

विचित्र....विचित्र म्हणजे? रोहिणी नी विचारलं

अगं म्हणजे आम्ही सगळे recess मध्ये बसलो होतो डब्बा खात, तर हिच्या एकदम पोटातच दुखायला लागलं...

अगं मग पटकन sick room मध्ये जाऊन औषधं नाही का द्यायची!!..

अगं तसं नाही गं आई...तिचं पोट दुखायला लागलं आणि skirt पण लाल झाला....

रोहिणीला घडलेला सगळा प्रकार लक्षात आला. तिनी स्वराला शांत केलं आणि आपण या विषयावर उद्या बोलुयात असं सांगून तिनी स्वराला झोपवलं.

Balcony मधे जाऊन, श्रीरंग ची वाट पाहात असतानांच ती विचार करू लागली...

खरंच काय पटकन दिवस जातात ना...एवढीशी असलेली स्वरा आज अचानक मोठी झाल्याचं तिच्या लक्षात आलं. रोहिणी एकदम स्वतःचंच लहानपण आठवलं. आपली पाळी आली तेव्हा आईनं गोड धोड केलं होतं... आणि मग लागले ते निर्बंध...इकडे हात लावू नकोस.. तिकडे हात लावू नकोस... या दिवसात असं करायचं नाही... तसं करायचं नाही... आता यापुढे नीटच बसायचं... व्यवस्थित अंगभर कपडे घालायचे...आणि कोणी सांगितले पण नाही.

पण स्वरा सोबत असं नको व्हायला... तिला या सगळ्या गोष्टींबद्दल नीट समजावून सांगायला हवं, तिच्या वयाला समजेल असं... शेवटी तिचा पण मुलीकडून स्त्रीत्वाकडे जाण्याचा प्रवास सुरू होणारच होता... रोहिणी नी ठरवलं की या सगळ्या बाबतीत स्वराशी शांतपणे बोलायचं... उद्या रविवार आहे, मग उद्याच त्याविषयी बोलायला हवं असा निश्चय करून ती श्रीरंग ची वाट पाहत राहिली.

दुसऱ्या दिवशी तिने स्वराला उठवलं. सकाळचं सगळं आटोपून तिने स्वराला तिच्यासोबत बाल्कनीत नेलं आणि तिच्याशी बोलू लागली.

स्वरा श्रुतीशी बोललीस का तू? आता बरी आहे ना तिची तब्येत...

हो आई मघाशीच मेसेज केला तिला, तेव्हा म्हणाली बरी आहे. पण आई हे असं का झालं गं तिला, म्हणजे आधी असं कोणालाच झालेलं पाहिलं नाहीये मी..

स्वरा, तिलाच नाही, जवळपास सगळ्याच मुलींना यातून जावंच लागतं.. May be या दोन-तीन वर्षात तू पण या सगळ्यातून जाशील..

म्हणजे, माझा पण skirt खराब होणार?? आणि हे असं सगळं का होणारे पण???

स्वरा, ते बघ...समोर घरटं दिसतंय चिऊ ताईनी बांधलेलं?

हो...

का बांधते गं चिऊताई घरटं ?

Ummmm.. तिच्या पिल्लांसाठी.. तिच्या अंड्यांना प्रोटेक्शन मिळावं म्हणून.

बरोबर! आता सांग मुलांना जन्म कोण देतं?

आई!

Correct..लहान मूल की नाही नऊ महिने आईच्या पोटात असतं, मग त्याला security मिळावी म्हणून मुलींच्या शरीरात पण अशीच मऊ घरट्यासारखी गादी तयार होते, पण पोटात बाळ नसल्यामुळे त्या गादीची गरजच लागत नाही... आणि म्हणून दर महिन्याला, ती गादी, नष्ट होण्याची प्रक्रिया चालू होते. आता मला सांग तू पडलीस, तुला खर्चटलं की काय होतं?

Umm...skin फाटते...म्हणजे open होतेआणि रक्त येतं....

Exactly, मग गादी नष्ट होतांना सुद्धा skin थोडीशी ओपन होते आणि म्हणून रक्त पण येतं.

ए आई.... पण मग सगळे कपडे खराब नाही का होणार?? स्वराचा इनोसंट प्रश्न...

Hmmmm... ते व्हायला नको म्हणून, लहान बाळांना कसं डायपर लावतात की नाही तसं आपण सॅनिटरी नॅपकिन्स वापरायचे..

ए आई पण म्हणजे मला आता खेळता नाही येणार?

अगं नाही गं... हे सगळं अत्यंत नॅचरल आणि रुटीन आहे. सुरुवातीला तुला adjust व्हायला वेळ लागेल ना बस तितकाच, बाकी तू सगळं काही रोजच्या सारखं करू शकतेस.. खाऊ शकतेस, खेळू शकतेस... सगळी मज्जा करू शकतेस.

आपल्या खेळात व्यत्यय येणार नाही हे ऐकून स्वराची कळी खुलली आणि ती गॅलरीतून बाबांकडे पळाली. रोहिणीचं लक्ष तिच्या गॅलरीत ठेवलेल्या गुलाबाच्या कुंडीकडे गेलं. काही दिवस आधी त्या रोपट्याला आलेली छोटीशी कळी आता हळू हळू खुलत होती... अगदी तिच्या स्वरा सारखी.

त्या कळीचा ही फुलापर्यंतचा प्रवास चालू झाला होता..

- कु. प्राजक्ता बर्वे

# प्रवास जीवनाचा

साहित्य गौरव ' पुरस्कार स्वीकारून पहिल्यांदाच शमिका पुण्याहून मुंबईला यायला निघाली. ती एकटीच होती ; तेव्हा गाडीत कुणीतरी चांगली सोबत असावी असं तिला मनोमन वाटत होतं.. गाडी सुरू झाली आणि थोड्याच वेळाने शमिका ने तिचं आवडतं आणि तिच्यासाठी अत्यंत महत्त्वाचं असं पुस्तक उघडलं. तिच्या एका आवडत्या व्यक्तीने तिला ते पुस्तक दिलं होतं...तिला फवला वेळ मिळाला की ती ते पुस्तक नेहमीच वाचत असे. तिने त्या पुस्तकाचे अक्षरशः पारायण केले असावेत असं म्हटलं तरी काही अतिशयोक्ती ठरणार नाही ! ते पुस्तक वाचताना  ती त्यात पुरती हरवून जायची आणि ते पुस्तक वाचताना तिला दर वेळी काही तरी नवं गवसायचं ! तीच तिच्या साठी त्या पुस्तकाची फलश्रुती असायची...!

गाडी जवळपास अर्ध्या तासानंतर एका स्टेशनवर थांबली . तिथे काही लोक उतरले आणि काही लोक गाडीत चढलेही ; तरी शमिकाचं लक्षच नव्हतं . ती आपली तिच्या विश्वात आणि पुस्तकातच रमली होती . पाच मिनिटांनी गाडी सुरू झाली . थोड्या वेळात शमिकाला कुणाच्या तरी गुणगुणण्याचा आवाज आला . ते गाणं ऐकताच शमिका झोपेतून खडबडून जागी झाल्यासारखी जागी झाली . तिने आश्चर्याने समोर बसलेल्या व्यक्तीकडे बघितलं . जवळपास तिच्याच वयाची असलेली , सुंदर , आणि लांबसडक केस असलेली एक स्त्री  तिच्या समोर बसली होती.

खिडकी बाहेरच्या निसर्ग सौंदर्याशी ती तिच्या बोलक्या डोळ्यांनी संवाद साधत होती ! वाऱ्याने डोळ्यावर येणारे केस बाजूला सारत होती आणि कुठलंतरी गाणं गुणगुणत होती...हे सारं काही शमिका प्रश्नार्थक मुद्रेने न्याहाळत होती ; तेवढ्यातच समोर बसलेल्या स्त्री ला तिच्याकडे कुणीतरी बघत असल्याचं जाणवलं आणि तिने झटकन शमिका कडे बघितलं.

दोघींची नजरानजर झाली. त्या दोघींनी एकमेकांकडे बघून स्मित केलं आणि शामिकाने ,

" हाय! मी शमिका ..."

असं म्हणून हस्तांदोनासाठी हात पुढे केला.

" हॅलो ! मी समिधा..."

समोर बसलेल्या महिलेने तेवढ्याच मैत्रीपूर्ण भावनेनं तिच्याकडे बघत स्वतः चा परिचय दिला. त्यांनी एकमेकींना अजून जाणून घेतलं. काही वेळ अश्याच इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या आणि बऱ्याच वेळा पासून शमिकाच्या मनात सतत पिंगा घालत असलेला प्रश्न विचारण्याचा मोह तिला अनावर झाला .

" अं....समिधा...एक विचारू? "

" हो विचार ना!"

" ऍक्चुली तू आलीस त्या नंतर एक गाणं गुणगुणत होतीस. ते गाणं ऐकतच मी लहानाची मोठी झाले . माझी एक अत्यंत आवडीची व्यक्ती हे गाणं गायची... "

शमिका जुन्या आठवणीत रमत म्हणाली.

"अय्या खरचं! माझी आजी हे गाणं गायची नेहमी! खरंतर ती आता नाहीये . पण तिची शिकवण अजुनही तेवढीच प्रभावी वाटते मला !" समिधा म्हणाली.

थोडा वेळ शांततेत गेला आणि नकळतच दोघींच्या तोंडून एकाच वेळी ते गाणं बाहेर पडलं...

" कबिराचे विणतो शेले... कौसल्येचा राम बाई"

दोघी एकमेकींकडे बघून हसल्या...

" What a coincidence! " समिधा म्हणाली.

शमिकाने मात्र त्यावर नुसतंच "हम्म" असं केलं.

" माझी आजी , मराठी साहित्याची अक्षरशः पूजा करायची ! मराठी भाषेचा तिचा गाढा अभ्यास होता . मी आणि आई - बाबा माझ्या जन्माच्या आधीपासूनच बोस्टन ला होतो. इकडे माझे आजी आजोबा राहायचे. आजोबा प्राध्यापक होते आणि आजी उत्तम गृहिणी... A perfect homemaker! माझ्या आजीने अनेक मुलींना घडवलं , वाढवलं आणि परिपूर्ण केलं..."

समिधा हे सारं बोलत असताना शमीकाच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणा क्षणाला बदलत होते . हे सारं काही तिने अनुभवलंय असं तिला वाटत होतं. आश्चर्यचकित होवून समिधाला तिने विचारलं ,

" तुझी आजी कोकणात गुहागरला राहायची...? तुमच्या वाड्याचं नाव *बरसाना* होतं? तुझी आजी कृष्णाची भक्त होती? समिधा....आजीचं नाव सुधा आहे...?.... होतं! "

अशी प्रश्नावली शमिकाने समिधाच्या पुढ्यात मांडली. समिधा थक्क होऊन शामिकाकडे काहीही न बोलता बघतच राहिली . तिचं लक्ष अचानक शामिकाच्या हातातल्या बांगडी कडे गेलं.

" तू शमिका सावंत? सावंत मावशींची मुलगी? "

समिधाने त्या बांगडीकडे रोखून बघत तिला विचारलं.

शमिकाने होकारार्थी मान हलवली आणि दोघींनाही साऱ्या गोष्टींचा उलगडा झाला. दोघींच्याही डोळ्यात पाणी तरळलं . शमिका क्षणार्धात तिच्या बालपणीच्या विश्वात पोहोचली आणि समिधाला सांगू लागली...

" माझे बाबा पोस्टमन होते . मी पाच वर्षांची असतानाच त्यांचं अपघाती निधन झालं. आमची उदरनिर्वाहाची सोयच बंद झाली...नाहीशी झाली. सुधा आजी आमच्या शेजारी राहायच्या. आईने त्यांना , " मला काम द्याल का काकू? पडेल ते काम करेन मी " असं म्हटलं आणि आजींनी सुद्धा

कुठलेही आढेवेढे न घेता आईला कामावर ठेऊन घेतलं. त्या आमच्याशी खूप छान बोलायच्या , आम्हाला चांगली वागणूक द्यायच्या . आई तिच्या सोबत मला त्यांच्याकडे घेऊन जायची. मी लहान असल्यापासूनच त्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले. अभंगांपासून ते ओव्यांपर्यंत सारं काही मला शिकवलं. मला वाचनाची आवड निर्माण झाली ती त्यांच्यामुळेच . मी दहावीत असताना अचानक माझी आई गेली. मी पार पोरकी झाले . पण आजींनी मात्र मला तसं अजिबात जाणवू दिलं नाही. त्यांनी मला कायमची त्यांच्याच कडे ठेऊन घेतली. माझ्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च त्यांनी केला. इतकंच नाही तर माझ्यावर त्यांनी स्वतः च्या नातीप्रमाणेच प्रेम केलं . कधीच मला दुय्यम स्थान दिलं नाही...."

शमिका ला अश्रू अनावर झाले. स्वतः ला आवरत , सावरत शमिका बोलू पुढे लागली...

" मी वीस वर्षांची झाले तेव्हा त्यांनी दोन सोन्याच्या बांगड्या बनवून घेतल्या. तेव्हा तुम्ही बोस्टनलाच होतात . मी खूप नको नको म्हटल्यावरही आजींनी त्यातली एक बांगडी मला दिली आणि म्हणाल्या एक माझ्या नातीसाठी आणि एक तुझ्या साठी!

वर्षे सरली तशी मी पुढील शिक्षणासाठी मुंबईला आले. मराठी साहित्यात एम. ए. केलं. विद्यापीठातून पहिली आले तेव्हा त्यांनी मला हे पुस्तक दिलं..(शमिकाने ती वाचत असलेलं पुस्तक समिधाला दाखवलं.) ' प्रवास जीवनाचा '....या पुस्तकामुळे तर मी इथवर पोहोचू शकले! पुढे मुंबईलाच मी एका महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून रुजू झाले . पुढे मुंबईतच एका साहित्यिकाच्या मी प्रेमात पडले. सुधा आजींनीच आमचं लग्न लावलं. त्यांच्या आशीर्वादानेच मी आज सुखी आहे."

तीला मधेच थांबवत समिधा म्हणाली,

" आजी गेली तेव्हा तर आम्ही इथे आलो होतो ...तू दिसली नाहीस मला तिथे! तू आली नव्हतीस का?"

"आजी गेल्या तेव्हाच नेमकी मी गरोदर होते... डॉक्टरांनी मला सक्तीची विश्रांती घ्यायला सांगितली होती . म्हणून तर इच्छा असूनही मला येता आलं नाही; याची आजही मला खंत वाटते... तुला एक गम्मत सांगू..? आता आमचं स्वतःचं एक घर आहे. त्या घराचं नाव आम्ही *सुधा* ठेवलंय...माझे यजमान म्हणतात की त्यांना आजीच्या कुशीत शिरल्या सारखं वाटतं ! म्हणून घराचं नाव सुधा ठेवलं...आज सगळं छान आहे ; पण ते बघायला आजी नाहीत...!"

शमिका आणि समिधा आजींबद्दल बोलता बोलता हरवून गेल्या आणि मुंबईच्या स्टेशन वर गाडी थांबली! दोघींनी एकमेकीना आलिंगन दिलं आणि निघून गेल्या...दोघीही खरंतर येताना एकट्याच आल्या होत्या पण जाताना त्यांच्या सोबत खूप काही घेऊन गेल्या.....!


- कु. भार्गवी बाबरेकर

# समारोप...!

रसिकहो, गेले 2 वर्ष आपण खूप वेगळ्या परिस्थितीत अडकलो आहे. सगळे जण परोपरीने या नकारात्मकतेला सकारात्मक कसं करता येईल यासाठी प्रयत्न करत आहेत. तसा हा दोन वर्षांचा घरी बसण्याचा कंटाळा सगळयांना आलाय हे होणं सुद्धा स्वाभाविक आहे.

२ वर्षाचा हा नको असलेला प्रवास सुद्धा आपण स्वीकारला आणि जसं जमेल तसं यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न अजूनही करतोय. ही सगळी परिस्थिती निवळून लवकरच आपलं आयुष्य पूर्ववत व्हावं हीच ईश्वरचरणी प्रार्थना..याच सकारात्मकतेच्या शृंखलेत आमचं हे " ती" चं पान आपल्या साठी आणलं. आपल्या छंदांना आवडींना वेळ मिळायला लागला. आणि या लेखणीचा प्रवास सुरु झाला. आपलं प्रेम असंच असू द्या. पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

- सौ. सायली देशपांडे



# KEEP TRAVELLING !!